# नवभारत

## जून 2019

## अनुक्रमणिका


✦ लेखमाला : बाकी विश्रब्ध शारदा - लेख - 1

**पत्रमहर्षी हरिभाऊ** 3

अंजली सोमण

✦ **मार्क्स आणि त्याचा समाजवाद :**

**एक ऑर्वेलियन दृष्टिक्षेप** (भाग एक) 18

मनोज पाथरकर

✦ लेखमाला : साद-पडसाद - लेख - 19

**'साद पडसादांचा अन्वय : यमुनापर्यटन ते ब्र :**

**एक कलात्मक वाङ्मयीन अनुबंध'** 25

स्वाती सुहास कर्वे

✦ **जुने लेखन** 35


Scanned by CamScanner

# मार्क्स आणि त्याचा समाजवाद : एक ऑर्वेलियन दृष्टिक्षेप (भाग एक)

मनोज पाथरकर

Socialism is such elementary common sense.... the idea that we must all cooperate and..... every-one does his fair share of work and gets his fair share of provisions seems so blatantly obvious..... yet socialism is not establishing it self.

-- George Orwell
(Road to Wigan Pier, 1937, p. 159)

होय, ऑर्वेल समाजवादाचा समर्थक होता. 'मी का लिहितो' या निबंधात तो आपली लेखनामागची भूमिका स्पष्टपणे मांडतो – 'हुकूमशाहीला विरोध आणि लोकशाही समाजवादाचे समर्थन'. सर्व प्रकारच्या हुकूमशाहीला त्याचा विरोध होता. उघडपणे अविवेकी आणि दंडुकेशाहीची समर्थक असलेल्या फॅसिस्ट हुकूमशाहीविरुद्ध लोकांना वेगळे सावध करण्याची गरज ऑर्वेलला वाटली नाही. मात्र कामगारांच्या नावाने विवेकी राज्यव्यवस्था निर्माण करताना कम्युनिझमदेखील हुकूमशाहीचे रूप धारण करतो हे त्याला सुशिक्षित डाव्या समर्थकांच्या लक्षात आणून द्यायचे होते. 'खुल्या लोकशाही' समाजवादाला त्याचे समर्थन होते. समाजवादाला हुकूमशाहीकडे नेणाऱ्या बाबींवर टीका करताना एका महत्त्वाच्या शक्यतेकडे मात्र त्याचे दुर्लक्ष झाले. फॅसिस्ट किंवा साम्राज्यवादी शक्ती उदारमतवादी लोकशाहीची यंत्रणा वापरून जगातील बहुसंख्य जनतेवर छुपी हुकूमशाही लादू शकतात हे त्याने लक्षातच घेतले नाही. नोम चॉम्स्कीसारख्यांनी नंतर दाखवून दिले की, असे राज्यकर्ते प्रसारमाध्यमांचा वापर प्रचारासाठी तसेच चर्चा मर्यादित ठेवण्यासाठी करू शकतात. एकूणच समाजवादाच्या समर्थनामागची ऑर्वेलची भूमिका 'निंदकाचे घर असावे शेजारी' अशी झाली.

या लेखात समाजवादाबद्दलच्या ऑर्वेलच्या भूमिकेचा थोडक्यात परामर्श घेतलेला आहे. 'द रोड टू वायगन पियर'सारख्या रिपोर्ताजमधून [1], 'ॲनिमल फार्म' आणि 'नाइन्टीन् एटीफोर' यांसारख्या कादंबऱ्यामधून आणि वीस वर्षे अखंडपणे प्रकाशित होत राहिलेल्या निबंध आणि वृत्तपत्रीय लेखांमधून ऑर्वेलची भूमिका वारंवार प्रकट होताना दिसते. 'ॲनिमल फार्म'मधील रूपकातून मांडलेल्या मार्क्सच्या विचारांपासून सुरुवात करून प्रस्तुत लेख ऑर्वेलच्या समाजवादाच्या आकलनाकडे वळतो. हे करताना डेविड हार्वेसारख्या अभ्यासकांच्या विश्लेषणाचा संदर्भ घेतलेला आहे. 1950 ते 2010 या काळातील आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक घडामोडींचे विश्लेषण हार्वे मार्क्सच्या आर्थिक विचाराच्या आधारे प्रभावीपणे करतो (मार्क्सचा अर्थविचार बाजूला ठेवून मार्क्सवादाचा विचार करता येत नाही.) ऑर्वेलची समाजवादाची मांडणी तो ज्या परिस्थितीत आणि ज्या दृष्टिकोनातून कामगार वर्गाकडे वळला त्यामुळे प्रभावित झालेली असल्याने काही चरित्रात्मक संदर्भही इथे विचारात घेतलेले आहेत. ऑर्वेलने डाव्या विचारवंत–कार्यकर्त्यांवर यथेच्छ तोंडसुख घेतलेले असले तरी समाजवादाविषयी गंभीर असणाऱ्या प्रत्येकाने लक्षात घ्यावे असे बरेच काही त्याच्या लेखनात सापडते.

## ओल्ड मेजरचे स्वप्न

ऑर्वेल क्वचितच त्याला अभिप्रेत असलेला समाजवादाचा अर्थ स्पष्ट करताना दिसतो. 'बर्नहॅम आणि व्यवस्थापकीय क्रांती' या दीर्घ लेखात तो म्हणतो की, "समाजवाद म्हणजे लोकशाही, सामाजिक समता आणि आंतरराष्ट्रीय (political democracy, social equality and internationalism) या तत्त्वांनुसार चालणारी राज्यव्यवस्था." समाजवादाच्या या संकल्पनेमागील मुख्य प्रेरणा 'शास्त्रीय आर्थिक विचार' नसून 'न्याय्य व्यवस्थेची निर्मिती' ही आहे.

'ॲनिमल फार्म'मध्ये मार्क्स 'ओल्ड मेजर'च्या रूपात समोर येतो. कादंबरीचा फॉर्म प्राण्यांच्या रूपककथेचा

Scanned by CamScanner

# लेखकांचा परिचय



✠ **मुखपृष्ठावरील चित्र :**

**चित्रकार - जितेंद्र अशोक साळुंखे**

**पत्ता :-** मल्हारपुरा, मूक-बधिर विद्यालयामागे, चोपडा, जिल्हा जळगाव - 425 107.

भ्रमणध्वनी : 9970783405.

✠ **डॉ. अंजली सोमण.**

एम. ए. पीएच. डी. श्री. ना. दा. ठा. कला-वाणिज्य महाविद्यालय पुणे येथे प्रपाठक आणि संशोधन मार्गदर्शक. 'बंदिश', 'खोल डोहाच्या तळाशी', 'देहाचिये गुंती' या तीन कादंबऱ्या. 'साहित्य आणि सामाजिक संदर्भ', 'मराठी कथेची स्थितिगती' हे समीक्षा ग्रंथ. भाषाविज्ञान वं साहित्य–समीक्षेवर संपादित पुस्तके. 'एका स्नेहबंधांची गोष्ट', 'एक संपादक – एक लेखिका', 'सर्वमंगल क्षिप्राबद्दल' ही साहित्यिकांमधील पत्रव्यवहारांवर संशोधन करणारी संपादने. वृत्तपत्रांतून आणि अन्य नियतकालिकांतून लेखन.

***पत्ता :–*** 3B/A1/27, न्यू अजिंठा ॲव्हेन्यू, कोथरूड, पौंड रोड, कृष्णा हॉस्पिटलजवळ, पुणे - 411 038

मो. 9404227505 ईमेल anjalisoman1947@gmail.com

✠ **डॉ. मनोज पाथरकर.**

ठाणे येथील 'जोशी बेडेकर' महाविद्यालयात इंग्रजी या विषयाचे प्राध्यापक. त्यांनी 'हक्सले, ऑरवेल आणि गोल्डिंग यांच्या डिस्टोपियम कादंबऱ्यांचा रेमंड विल्यम्सच्या 'समीक्षा-पद्धतीने अभ्यास' या विषयावर संशोधन करून आय्. आय्. टी. मुंबई या संस्थेकडून पीएच. डी. ही पदवी मिळविली आहे. 2018 या वर्षात 'लोकसत्ता' या वर्तमानपत्रातून त्यांनी 'ऑर्वेलची प्रकाशवाणी' या शीर्षकाखाली 25 लेखांची मालिका लिहिली होती.

**पत्ता :-** 902 - मल्हार एशियाटिक एन्क्लेव्ह. पोखरण रोड क्र. 1, वर्तकनगर, ठाणे 400 606.

मो : 9892373869. दूरध्वनी : 022-25883451. ईमेल – manojrm074@gmail.com

✠ **डॉ. स्वाती सुहास कर्वे**

पुण्यातील महाविद्यालयातून मराठीचे अध्यापन पूर्ण. वृत्तपत्रातून व नियतकालिकांतून मुख्यतः स्त्रियांच्या प्रश्नांच्या विविध पैलूंवर लेखन.

***पत्ता :–*** 5th Avanue, ब्लॉक नं 203, शेठ उत्तमचंद गांधी मार्ग, सिटी प्राईड, कोथरूडजवळ कोथरूड, पुणे - 38. भ्रमणध्वनी : 9822082201



Scanned by CamScanner